सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १५ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला पृथ्वीवर सुखरूप परतले

## चार पॅराशूटच्या मदतीने यान उतरले समुद्रात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५कॅलिफोर्निया**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये वास्तव्य करणारे पहिले भारतीय ठरलेले अंतराळवीर शुभांशू शुक्ला हे १८ दिवसांच्या मोहिमेनंतर सुखरूपपणे पृथ्वीवर परतले आहेत. शुभांशू शुक्ला आणि इतर चार अंतराळवीरांना घेऊन येणारं यान भारतीय प्रमाणवेळेनुसार आज दुपारी ३ वाजता कॅलिफोर्नियामधील समुद्र किनाऱ्याजवळ पॅसिफिक महासागरामध्ये सुखरूपपणे उतरले. शुभांशू शुक्ला हे ॲक्सिओम मिशन ४ या मोहिमेचा भाग होते. त्यांनी १८ दिवस अंतराळात वास्तव्य करताना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये विविध प्रयोग केले. दरम्यान, आज स्पेसएक्सचे ग्रेस हे यान शुभांशू शुक्ला यांच्यासह इतर चार जणांना घेऊन सुखरूप पृथ्वीवर परतले.शुभांशू शुक्ला आणि इतर चार अंतराळवीर २५ जून २०२५ रोजी ड्रॅगन या अंतराळ यानामधून फाल्कन ९ या रॉकेटच्या मदतीने अंतराळात गेले होते. २६ जून रोजी ते आंतरराष्ट्रीय अंतराळ स्टेशनमध्ये पोहोचले. तिथे शुभांशू शुक्ला यांनी ६० हून अधिक शास्त्रीय प्रयोग केले. त्यामध्ये अंतराळात स्नायूंचं होणारं नुकसान, मानसिक आरोग्य आणि अंतराळात धान्य रुजवण्यासारख्या प्रयोगांचा समावेश आहे.दरम्यान, कॅलिफोर्नियातील समुद्र किनाऱ्याजवळ शुभांशू शुक्ला आणि इतर अंतराळवीरांना घेऊन येणारं यान उतरल्यानंतर सर्व अंतराळवीरांना यानातून सुखरूपपणे बाहेर काढून वैद्यकिय तपासणीसाठी नेण्यात आले. आता त्यांना सुमारे १० दिवस क्वारेंटाईनमध्ये ठेवलं जाईल. यादरम्यान, त्यांच्या प्रकृतीवर बारीक लक्ष ठेवलं जाईल.



### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर एक पोस्ट करत केले स्वागत

इस्रो आणि नासाच्या मिशन ॲक्सिओम-०४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात गेलेले शुभांशू शुक्ला सुखरूप परतले. भारत देशासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. संपूर्ण देशाचे शुभांशू शुक्ला यांच्या या मोहिमेकडे लक्ष लागले होते. शुभांशू शुक्ला सुखरूप पणे परत येताचा त्यांच्या आई-वडिलांनी आनंदोत्सव साजरा केला. तसेच शुभांशू शुक्ला यांच्यावर संपूर्ण देशातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे. शुभांशू शुक्ला परतताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर एक पोस्ट करत स्वागत केले.अंतराळातील ऐतिहासिक मोहिमेतून पृथ्वीवर परतणाऱ्या ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचे राष्ट्रासोबत स्वागत करतो. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे भारताचे पहिले अंतराळवीर म्हणून शुभांशू शुक्ला यांनी धैर्य आणि समर्पण भावनेने अब्जावधी स्वप्नांना प्रेरणा दिली आहे. आपल्या स्वतःच्या मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेच्या दिशेने हा आणखी एक मैलाचा दगड आहे - गगनयान, असे पंतप्रधान मोदी यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

## तुमच्यापेक्षा जास्त बोलता येते...

### विधानसभेत ठाकरेंचे आमदार आणि शिंदेसेनेचे मंत्री भिडले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई-** विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात वांद्रे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकरणात विचारलेल्या प्रश्नावरून ठाकरे गटाचे आमदार आणि शिंदेसेनेचे मंत्री भिडल्याचे दिसून आले.

वांद्रे येथील आमदार वरूण सरदेसाई यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून विधानसभेत प्रश्न विचारला होता. त्यावेळी समाधानकारक उत्तर सरकारकडून आले नाही त्यावरून सरदेसाई यांनी मंत्र्यांना ब्रिफिंग झाले तेवढेच त्यांनी उत्तर दिले असेल. छापील उत्तरापलीकडे मंत्र्यांनी उत्तर दिले नाही असं म्हटले त्यावर शिंदेसेनेचे मंत्री संतापले.

मंत्री शंभुराज देसाई म्हणाले की, मला या प्रकरणाच्या खोलात जायचे नव्हते परंतु माझ्याकडे अपुरे ब्रिफिंग आहे, जेवढे उत्तर



दिले तेवढेच बोलायचे होते असं सांगण्यात आले. २०१९ ते २०२२ या अडीच वर्षाच्या काळात या प्रकरणाचा तत्कालीन राज्य सरकारने केंद्राकडे पाठपुरावा केला नाही असं सांगताच विरोधकांनी गोंधळ घातला. त्यावर आता ऐकून घ्या, १९ ते २२ या काळात काय झाले ते सांगा. एकही पत्र राज्य सरकारने दिले नाही. कुणाचे सरकार होते, २०२२ मध्ये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर ४ वेळा पत्र देण्यात आली. तुम्ही काय केले..आमची लाज काढू नका, तुम्ही काय केले ते सांगा. आमची काय लाज काढता, तुम्ही काय केले नाही. आम्ही केले असं त्यांनी संतापून म्हटले.

त्यावेळी मंत्री गुलाबराव पाटील उभे राहिले आणि त्यांनी ठाकरे गटाच्या आमदारांवर आगपाखड केली. ते म्हणाले की, वरूण सरदेसाई यांनी प्रश्न विचारल्यानंतर मंत्री देसाई यांनी उत्तर दिले, इतरांनी प्रश्न विचारले त्यावर मंत्र्यांनी उत्तर दिले परंतु उत्तर देताना एखादी शंका असेल तर ती विचारा, ही चर्चा सुरू आहे. परंतु तुम्ही ब्रिफिंग घेऊन आले बोलता, तुम्ही जन्मत: हुशार होऊन आलात का, लाज काढायचा अधिकार कुणी दिला, तुमच्यापेक्षा जास्त बोलता येते मला असं गुलाबराव पाटील यांनी संतापून म्हटले.

## अमरावती जिल्ह्यातील बोगस शिक्षक भरती प्रकरणावर

## विधानसभेत आ. प्रविण तायडे यांचा हल्लाबोल

### दोषींवर कठोर कारवाईची मागणी; शिक्षण विभागाची जबाबदारी ठरवा - आ.तायडे

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५मुंबई -** अमरावती जिल्ह्यातील बोगस शिक्षक भरती प्रकरणावर विधानसभेत आ. प्रविण तायडे यांनी सोमवारी सरकारला धारेवर धरले.ही शिक्षण व्यवस्थेची भ्रांत करणारी भरती असून, या प्रकारात गुंतलेल्या प्रत्येकावर कठोर कारवाई झाली पाहिजे,अशी ठाम मागणी त्यांनी सभागृहात केली.तायडे म्हणाले की,शिक्षक म्हणजे समाजाचे शिल्पकार. मात्र बनावट कागदपत्रांद्वारे अशा व्यक्तींना शिक्षकपद मिळणे हे विद्यार्थ्यांवर अन्याय आहे. त्यामुळे यामधील दोषींना वाचवण्याचा



एकही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही.त्यांनी या प्रकरणातील संपूर्ण चौकशी अहवाल विधानसभेत मांडण्याची आणि संल्म्न अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली.

कारवाई केवळ बनावट शिक्षकांवर नव्हे, तर त्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही व्हावी,असा ठपका त्यांनी ठेवला.सभागृहातील त्यांच्या या ठाम भूमिका घेतलेल्या भाषणामुळे वातावरण चांगलेच तापले होते. सरकारने या मुद्द्यावर तत्काळ उत्तर द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.अमरावती जिल्ह्यात काही वर्षांपासून शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये बनावट शैक्षणिक प्रमाणपत्रे व अनुभव दाखवून काही व्यक्तींनी शाळांमध्ये नियुक्त्या मिळवल्याचा प्रकार उघडकीस आला होता. याबाबत चौकशी सुरू असतानाच राजकीय स्तरावरही आवाज उठवला जात आहे.

## पवारांनी भाकरी फिरवलीच

### शशिकांत शिंदे पक्षाचे नवे प्रदेशाध्यक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई-** शशिकांत शिंदे यांच्या नावाची अखेर पवार गटाच्या नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून घोषणा करण्यात आली आहे. खुद्द खासदार शरद पवार यांनीच शिंदे यांच्या नावाची घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील पक्षाच्या वर्धापनदिनी जाहीर भाषणात जयंत पाटील यांनी मला प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त करावे, अशा भावना व्यक्त केल्या होत्या. त्यांच्या या विनंतीनंतर शरद पवार यांनीदेखील प्रदेशाध्यक्षपदासाठी लवकरच नव्या नावाचा विचार केला जाईल, असे सांगितले होते. त्यानंतर आज अखेर जयंत पाटलांना कार्यमुक्त करत शशिकांत शिंदे पक्षाचे नवे प्रदेशाध्यक्ष असतील अशी घोषणा करण्यात आली.



प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देताना जयंत पाटील यांनी मी प्रदेशाध्यक्ष पदावरून बाजूला होत असून, जे नवीन अध्यश्र असतील त्यांच्या पाठीशी आपण उभं राहिलं पाहिजे. हा शेवट नाही नव्या पर्वाची सुरूवात असल्याचेही जयंत पाटील यांनी म्हटले आहे. तसेच मी जातोय पण सोडत नाहीये असे सूचक विधानही जयंत पाटील यांनी केले आहे.

## पक्षात दिवाळी अन् माझ्या घरात अंधार

### राज ठाकरेंचे ज्येष्ठ सहकारी प्रकाश महाजनांना अश्रू अनावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई -** महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना ठाकरे गट यांची युती होत सल्याची चर्चा असतानाच आता मनसेतुनच मोठी बातमी समोर आली आहे. मनसे आणि राज ठाकरे यांनी बाजू भक्कमपणे मांडणारे प्रकाश महाजन यांनी आता पक्षावरची उघड नाराजी बोलून दाखवली आहे. नाशिकमध्ये सुरू असलेल्या मनसेच्या राज्यस्तरीय शिबिराचा आजचा दुसरा दिवस आहे. या शिबिरासाठी स्वत: राज ठाकरेंसह सर्व वरिष्ठ नेते उपस्थित आहेत. मात्र, या शिबिराला प्रकाश महाजन यांनाच निमंत्रण दिलेलं नाही. प्रकाश महाजन यांनी राज आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीबाबत केलेलं भाष्य आणि त्यांचा मीडियातील वावर यावरुन त्यांना साईडलाईन केल्याची चर्चा आहे.

महाजन यांनी पक्षात एकटं पडल्याची भावना अप्रत्यक्षरित्या बोलून दाखवली. भाजप खासदार नारायण राणे यांच्यासोबत टीका टीपण्णी झाली त्यावेळेस माझ्यावर शाब्दिक हल्ला केला. पण मनसेतील कोणत्याही वरिष्ठ नेत्यांना जाहीर माझी बाजू घेतली नाही. मी नाराज नाही, खिन्न आणि दुःखी आहे असंही प्रकाश यावेळी महाजन म्हणाले. तसंच, शिबिरासाठी बोलावलं नाही. मात्र, पक्षाच्या निष्कर्षामध्ये प्रवक्त्यांना बोलावलं नाही. इतर प्रवक्ते




आहेत त्यांच्याकडे इतर पदांची जबाबदारी असेल, माझ्याकडं नाही. त्यामुळं मला निमंत्रण आलं नाही. पक्षाचा निर्णय आहे, कुणाला बोलवाव, कुणाला नाही. हा माझ्यासाठी दुर्दैवी क्षण आहे काय बोलणार, असं प्रकाश महाजन यावेळी म्हणाले.

मी नाराज नाही खिन्न आणि दुःखी आहे. माझी आता भावना झाली आता बस झालं आपल्याला घरातच मान नाही तर इतर ठिकाणी काय मिळणार? असं प्रकाश महाजन म्हणाले आहेत. अशा पद्धतीने पक्ष मला वागवत असेल तर मी कोणत्या तोंडाने पक्षाची बाजू मांडू असं म्हणत प्रकाश महाजन यांच्या डोळ्यात पाणी आले.

फेसबुकवर प्रतिक्रिया येतात याला पक्षातच किंमत नाही. नसलेले आरोप माझ्यावर टाकले जातात. मी गेल्या तीन चार दिवस अस्वस्थ आहे, असं प्रकाश महाजन म्हणाले.

## ऑलिम्पिक क्रिकेटसाठी केवळ ६ संघांना संधी, कशी ठरणार पात्रता, कोण घेणार निर्णय?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५नवी दिल्ली -**

१२८ वर्षानंतर लॉस एंजेल्समध्ये होणाऱ्या २०२८ च्या ऑलिंपिकमध्ये क्रिकेट या खेळाचे पुनरागमन १२ जुलै रोजी होणार आहे. लॉस एंजेल्सपासून सुमारे ५० किमी अंतरावर असलेल्या पोमेना शहरातील फेअरग्राउंड्स स्टेडियमवर क्रिकेटच्या सामन्यांची सुरुवात होणार आहे. ऑलिंपिकमध्ये पुरुष आणि महिला गटात प्रत्येकी ६ संघ टी२० स्वरुपाचे क्रिकेट सामने खेळतील. दोन्ही गट मिळून १८० खेळाडू सहभागी होतील. १९०० मध्ये पॅरिस ऑलिंपिकमध्ये यापूर्वी फक्त एकदाच ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्स या दोनच संघांनी स्पर्धेत भाग घेतला होता. ग्रेट ब्रिटनने स्पर्धेतील एकमेव सामना जिंकून सुवर्णपदक जिंकले होते.

कसे असेल वेळापत्रक?

स्पर्धेच्या वेळापत्रकानुसार, १२ जुलैपासून सामन्यांना सुरुवात होईल. पदकासाठीचे सामने २० आणि २८ जुलैला खेळवले जातील. बहुतेक दिवशी दोन-दोन सामने खेळवले जातील. लॉस एंजल्सच्या स्थानिक वेळेनुसार, हे सामने सकाळी ९ वाजता आणि संध्याकाळी ६.३० वाजता सुरु होतील. म्हणजेच




भारतात पहिला सामना रात्री ९.३० वाजता तर दुसरा सामना दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता सुरु होईल. १४ आणि २१ जुलै रोजी कोणतेही सामने होणार नाहीत.

यंदा पुरुष आणि महिला गटात प्रत्येकी ९० खेळाडूंचा कोटा असेल. १२ स्पर्धक संघ १५ खेळाडूंचा संघ जाहीर करतील. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीने (खजउ) २०२८ च्या ऑलिंपिक खेळांबाबत ही माहिती दिली आहे. ऑलिम्पिक स्पर्धेसाठी कोणते ६ संघ पात्र ठरणार याचा निर्णय खउउ कडून घेतला जाईल.

१९०० मध्ये पॅरिस ऑलिंपिकमध्ये यापूर्वी फक्त एकदाच ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्स या दोनच संघांनी स्पर्धेत भाग घेतला होता. ग्रेट ब्रिटनने स्पर्धेतील एकमेव सामना जिंकून सुवर्णपदक जिंकले होते.

भारतीय पुरुष आणि महिला संघ दोन्ही प्रकारात सुवर्णपदकाचे दावेदार आहेत. टी२० विश्वचषक विजेत्या पुरुष संघाचे नेतृत्व सूर्यकुमार यादव करत आहे. दुसरीकडे, महिला संघाचे नेतृत्व हरमनप्रीत कौर करत आहेत. दोन्ही संघ जागतिक क्रिकेटवर वर्चस्व गाजवतात आणि प्रत्येक स्पर्धेत विजेतेपदाचा दावेदार असतात.

## संपादकीय ......

# मतदार याद्यांतील सुधारणा

बिहारमधील मतदार यादीतील विशेष पुनरिक्षण कार्यक्रम (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन – एसआयआर) घटनाबाह्य असल्याचा विरोधी पक्षांचा दावा होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात तो घटनात्मकदृष्ट्या वैध ठरवून, बिहारमध्ये हा कार्यक्रम सुरू ठेवण्याची मुभा दिली होती. त्यानंतर आता निवडणूक आयोगाकडून देशभरच हा कार्यक्रम राबवला जाणार आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा सक्रिय झाली असून, याबाबत २८ जुलैनंतर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. यावरून पुन्हा रणकंदन होणार हे नक्की. पण हा निर्णय स्वागतार्हच म्हणावा लागेल. निवडणूक आयोग पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या हातचे बाहुले बनले आहे, असा आरोप करताना राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनी बिहारमधील मतदार यादीतील 'एसआयआर' घटनाबाह्य असल्याचा दावाही केला आहे. बहुसंख्याकवादी सरकार सत्तेत राहण्यासाठी चालवलेला हा कार्यक्रम असल्याचा त्यांचा आरोप आहे. नागरिकत्व ठरवण्याचे अधिकार निवडणूक आयोगाला नाहीत, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. अनेक विरोधी पक्ष आणि इतर अनेकांनीही सरकारच्या या कृतीविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. 'एसआयआर'मुळे वैध नागरिक मतदानापासून वंचित राहतील, अशी शक्यता विरोधकांनी व्यक्त केली होती. काही राज्यांच्या मुख्य मतदान अधिकार्यांनी त्यांच्या राज्यात यापूर्वी झालेल्या 'एसआयआर'नंतरच्या मतदार याद्या जाहीर करण्यास आरंभ केला होता.दिल्लीमध्ये २००८ साली आणि उत्तराखंडमध्ये २००६ मध्ये शेवटचा 'एसआयआर' राबवला होता. या राज्यांमध्ये यापूर्वी झालेल्या 'एसआयआर'नंतरच्या मतदार याद्यांचा आधार नव्याने ही प्रक्रिया अमलात आणताना घेतला जाणार आहे. मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या दृष्टीने ही प्रक्रिया योग्यच म्हणावी लागेल. बिहारच्या बाबतीत २००३ च्या मतदार यादीचा आधार घेऊन ही प्रक्रिया राबवली जात आहे. मात्र हा वाद सुरू होण्यास निवडणूक आयोग हाच जबाबदार आहे. कारण बिहारमध्ये २०२५ मध्ये निवडणूक होणार, हे आयोगाला ठाऊक होते. पण निवडणुकांना केवळ चार महिने राहिलेले असताना मतदार याद्यांची वैधता आणि त्यामधील नावांचा खरेखोटेपणा याबाबत अचानक शंका उपस्थित करण्यात येऊ लागल्या. खरे तर हे काम त्यापूर्वीच सुरू व्हायला हवे होते, असा आरोप होतो. त्या संबंधात आयोगाने २४ जूनला आदेश काढले आणि २५ जुलैपर्यंत मतदारांनी आपापल्या नावांचा मतदार याद्यांत अंतर्भाव करणे कसे योग्य आहे हे सिद्ध करून दाखवावे, अशा सूचना दिल्या. म्हणजे आपण कायदेशीर मतदार आहोत, हे मतदारांनी स्वतःच सिद्ध करायचे होते. वास्तविक निवासाबाबत खात्री केल्याखेरीज आधार कार्ड दिले जात नाही आणि सर्व तपासण्या केल्यानंतरच रेशन कार्ड दिले जाते. या निर्णयाने बिहारमधील तीन कोटी लोकांना आपण अधिकृत मतदार असल्याचे केवळ महिनाभरात सिद्ध करावे लागणार आहे. बिहारमधील ६० टक्के मतदारांची पडताळणी अगोदरच पूर्ण झाली आहे. कोणाचीही नावे त्यांचे म्हणणे ऐकून न घेता काढली जाणार नाहीत, असे आश्वासन निवडणूक आयोगाच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात दिले आहे. पण आयोगाने आकस्मिकपणे ही प्रक्रिया सुरू केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले आहेत. तरीही बिहारमध्ये 'एसआयआर' प्रक्रिया सुरू ठेवण्यास मान्यता दिली होती, हे महत्त्वाचे.

मुळात बिहारमध्ये नेपाळ, बांगला देश व म्यानमारमधील घुसखोरांची संख्या मोठी आहे. हेच चित्र आसाम व पश्चिम बंगालमध्येही आहे. आता मतदार यादी सुधारण्याचा कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर हाती घेण्यात आल्यास बोगस मतदारांची नावे वगळली जाऊन याद्यांची साफसफाई होईल. लोकशाहीची बूज राखण्यासाठी हे काम नेटाने व प्रामाणिकपणे पूर्ण केलेच पाहिजे. कोणत्याही निवडणुकीत पराभव झाल्यास ईव्हीएमला दोष दिला जातो. महाराष्ट्राच्या २०२४च्या विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणीत महायुतीचा अभूतपूर्व विजय झाला, तेव्हा त्या निवडणुकीतही हेराफेरी आणि मॅचफिक्सिंग झाल्याचा आरोप झाला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तसा आरोप केला होता. या आक्षेपांना निवडणूक आयोगाने उत्तरही दिले होते. मात्र तेलंगणा, कर्नाटक अथवा हिमाचल प्रदेशात काँग्रेसचा विजय झाला, तेव्हा त्या निकालांबद्दल राजकीय पक्षांकडून जराही शंका व्यक्त झाली नव्हती.२०२० साली बिहार विधानसभेच्या निवडणुका झाल्या, तेव्हाही नीतिश कुमार यांचा जेडीयू आणि भाजपच्या आघाडीचा विजय झाला. त्यावेळीही निवडणुकीत गैरप्रकार झाले आणि आयोगाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले, असा आरोप राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालूप्रसाद यादव आणि तेजस्वी यादव यांनी केला होता. न्यायालयात जाण्याची भाषाही करण्यात आली. पण त्यानंतर यादव पिता-पुत्रांनी कोणतेही पुरावे न्यायालयात अथवा निवडणूक आयोगाकडे सादर केले नाहीत. आता मतदार यादीतील विशेष फेरतपासणीमुळे मतदार यादीत पारदर्शकता येईल, कथित आणि बेकायदा मतदारांना यादीतून हटवले जाईल. त्यातून चुकीच्या मार्गाचा आधार घेत निवडणूक जिंकण्याचे, सत्ता मिळवण्याचे अनेक राजकीय पक्षांचे तसेच 'बाहुबली' उमेदवारांचे मनसुबे धुळीस मिळतील, असे म्हणायला हरकत नाही. लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी आणि निवडणुकीतील गैरप्रकार टाळण्यासाठी हा कायदेशीर पायबंद घालणे गरजेचे होते. मात्र, या वाटा कायमच्या बंद करण्याचे आव्हान आहेच.

# विभागीय लोकशाही दिनात १६ प्रकरणांवर सुनावणी

## प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीव पूर्वक प्रयत्न करा– विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती–** विभागीय लोकशाही दिनासाठी प्राप्त अर्जांवर विहित कालमर्यादेत कार्यवाही करुन निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. विभागाला प्राप्त होणाऱ्या प्रकरणांच्याबाबत मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, याची संबंधित विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागांना आज येथे दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १६ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक पोलीस आयुक्त पंकज कुमावत, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते.यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण १६ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली. सदर दाखल प्रकरणांवर आगामी पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित विभाग प्रमुखांना केल्या.विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे ३ स्वीकृत अर्ज, १० अस्वीकृत अर्ज (सामान्य तक्रारी) तसेच ३ प्रकरणे वेळेवर दाखल झालीत. यात एक प्रकरण महिला लोकशाही दिन अंतर्गत समाविष्ट होते, असे एकूण १६ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून ही प्रकरणे तत्काळ निकाली



काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावा, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना श्रीमती सिंघल यांनी यावेळी केल्या

# तुम्हीही धान्य साठविण्यासाठी केमिकलयुक्त पावडर वापरता?

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**




वर्षभराचं धान्य एकदाच भरून ठेवण्याचं काम कित्येक घरांमध्ये केलं जातं. आता मुंबईसारख्या काही ठिकाणी दमट हवेमुळे वर्षभर धान्य भरून ठेवणं थोडं अवघड जातं. कारण वातावरणामुळे ते लवकर खराब होतं. असे काही अपवाद सोडले तर इतर ठिकाणी मात्र गहू, डाळी, तांदूळ, मसाले, तिखट एकदम आणलं जातं. धान्य साठवून ठेवण्याच्या काही पारंपरिक पद्धतीही आहेत. पण त्या थोड्या वेळखाऊ असल्यामुळे आता बऱ्याच घरांमध्ये धान्याला सरळ केमिकलयुक्त पावडर लावली जाते आणि धान्य भरून ठेवलं जातं पण हे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतं.



तांदूळ आणि डाळी या पदार्थांना अनेक घरांमध्ये पावडर लावली जाते. कारण वापरण्यापुर्वी हे पदार्थ धुवून घेतले जातात. यामुळे धान्य जास्त दिवस टिकतं, त्यात अळ्या किडे होत नाहीत. पण ते धुताना जर तुमच्याकडून काही चुकत असेल तर त्याचा मात्र आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतो.

डाळ– तांदूळ आणि इतर धान्य साठविण्याचे पारंपरिक उपाय

१. धान्य साठवून ठेवण्याचा पारंपरिक उपाय म्हणजे त्याला चांगलं ऊन देऊन कडक उन्हात ते वाळवून घ्यावे.

२. यानंतर एखाद्या हवाबंद डब्यात किंवा ड्रममध्ये तळाशी कडुलिंबाचा पाला घालावा, त्यावर थोडं धान्य घालून त्यावर पुन्हा कडुलिंबाचा पाला घालावा.

त्यावर थोडं खडेमीठ ठेवावं. त्यावर पेपर झाकून टाकावा आणि पुन्हा याच पद्धतीने एकानंतर एक धान्य, कडुलिंबाचा पाला आणि मीठ असा थर द्यावा. या पद्धतीने साठवलेलं धान्य लवकर खराब होत नाही.

३. धान्य साठविण्यासाठी हल्ली एअर टाईट प्लास्टिकच्या बॅग मिळतात. त्यांचा वापर करण्यासही हरकत नाही.

# ठिबक व तुषार सिंचनासाठी 'या' दोन योजनेतून घेता येईल ९० टक्के अनुदान

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

प्रती थेंब अधिक पीक अंतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी लाभ घेतलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भुधारक लाभार्थ्यांना अनुक्रमे २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के असे एकुण ८० टक्के व ७५ टक्के पुरक अनुदान देय आहे.प्रति थेंब अधिक पीक योजनेतर्गत सुक्ष्म सिंचन घटकाकरीता निवड होऊन लाभ देण्यात आलेल्या अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती या प्रवर्गातील लाभार्थ्यांना पुढील दोन्ही योजनामधुन अनुदान देण्यात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत आणि क्षेत्राबाहेरील) अंतर्गत पुरक अनुदान देय असल्याने अशाप्रकारे दोन्ही योजनामधुन पात्र शेतकऱ्यांना मंजुर मापदंडाच्या ९० टक्के च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते.

अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीतील अल्प व अत्यल्प भुधारक लाभार्थ्यांना अनुक्रमे २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पुरक अनुदान मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतुन अदा करण्यात येते.




उर्वरीत १०%/१५ % अनुदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना/बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेमधुन अदा करण्यात येते.

**प्रवर्ग व देय अनुदान**

**१) अनुसुचीत जाती**

अ) अल्प व अत्यल्प भुधारक

– प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक – ५५%

– मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना/केंद्र पुरस्कृत अटल भूजल योजना – २५%

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना – १०% (जास्तीत जास्त रु. ९७,००० ठिबकसाठी आणि रु. ४७,००० तुषार सिंचनसाठी)

**– एकूण – ९०%**

ब) इतर शेतकऱ्यांना

– प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक – ४५%

– मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना/केंद्र पुरस्कृत अटल भूजल योजना – ३०%

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना – १५% (जास्तीत जास्त रु. ९७,००० ठिबकसाठी आणि रु. ४७,००० तुषार सिंचनसाठी)

– एकूण – ९०%



शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

२) अनुसुचीत जाती

अ) अल्प व अत्यल्प भुधारक

– प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक – ५५%

– मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना/केंद्र पुरस्कृत अटल भूजल योजना – २५%

– बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना – १०% (जास्तीत जास्त रु. ९७,००० ठिबकसाठी आणि रु. ४७,००० तुषार सिंचनसाठी)

– एकूण – ९०%

**ब) इतर शेतकऱ्यांना**

– प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक – ४५%

– मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना/केंद्र पुरस्कृत अटल भूजल योजना – ३०%

– बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना – १५% (जास्तीत जास्त रु. ९७,००० ठिबकसाठी आणि रु. ४७,००० तुषार सिंचनसाठी)

**– एकूण – ९०%**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत आणि क्षेत्राबाहेरील) अंतर्गत पुरक अनुदान देय असल्याने अशाप्रकारे दोन्ही योजनामधुन पात्र शेतकऱ्यांना मंजुर मापदंडाच्या ९० टक्के च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते.

अधिक माहितीसाठी संपर्क आपल्या जवळील सहाय्यक कृषी अधिकारी/मंडल कृषी अधिकरी/तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधा.

# शेतकऱ्यांसाठी अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीकस्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अचलपूर**

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन आणि गौरव करुन त्यांचे मनोबल वाढविण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत खरीप हंगाम सन २०२५ मध्ये राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, सूर्यफूल ही ११ पिके स्पर्धेमध्ये समाविष्ट असून अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट तसेच मूग व उडीद पिकासाठी ३१ जुलै आहे.स्पर्धेसाठी प्रवेशशुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु. ३०० वआदिवासी गटासाठी रु. १५० ठेवण्यात आली आहे.स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. स्पर्धकास भात पिकाच्या बाबतीत किमान २० आर वइतर पिकांच्या बाबतीत किमान ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. पीकस्पर्धा तालुका स्तरावर आयोजित करण्यात येणार असून सर्वसाधारण आदिवासी गटासाठी तालुका स्तरावरील पीकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुकास्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.




### अर्ज कोठे करावा व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र–अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलान, ७/१२, ८–अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास), पीकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँकखाते, चेक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत अशी कागदपत्रे असावीत. याबाबत तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी साहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा.

**प्रवीण मडघे–** तालुका कृषी अधिकारी (प्रभारी), अचलपूर.

राज्यपातळीवर प्रथम बक्षीस ५० हजार रु., द्वितीय ४० हजार रु., तर तृतीय बक्षीस ३० हजार रु. तसेच जिल्हापातळीवर प्रथम बक्षीस १० हजाररु, द्वितीय ७ हजार रु., तर तृतीय बक्षीस ५ हजार ठेवण्यात आले आहे. तालुका पातळीवर प्रथम बक्षीस ५ हजार रु, द्वितीय ३ हजार, तर तृतीय बक्षीस २ हजार रुपये आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. १५ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# ‘युग प्रवर्तक’ डॉ. हेडगेवार नाट्याला प्रचंड प्रतिसाद

## डॉक्टरांच्या तपस्वी चरित्राने श्रोते भारावले : कलावंतांचे समरस होऊन सादरीकरण





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती-** आद्यसर संघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनावर आधारित युग प्रवर्तक डॉ. हेडगेवार हे दोन अंकी नाटकाचे दमदार सादरीकरण संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात रविवारी झाले. सदर नाट्य प्रस्तुतीला प्रचंड प्रतिसाद अमरावतीकर जनतेने दिला. संपूर्ण सभागृह दर्शकांनी खचाखच भरलेले होते.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे प्रायोजित या नाट्य महानुभाव प्रयोगाचा शुभारंभ खासदार अनिल बोंडे, आमदार रवि राणा, अमरावती हानुभाव आश्रमाचे महंत कविश्वर कुळाचार्य मोहन महाराज, संघाचे विभाग संघचालक चंद्रशेखर भोंदू, महानगर संघचालक उल्हास बपोरीकर, भारत विकास परिषद अमरावती शाखा अध्यक्ष प्रा. डॉ. रविकांत कोल्हे, भारतीय उत्कर्ष मंडळ अमरावती शाखा अध्यक्ष दिलीप भुजाडे, नाटकाचे निर्मात व नादब्रह्माचे अध्यक्ष तसेच भारत विकास परिषदेचे नागपूर येथील प्रांताध्यक्ष पद्माकर धानोरकर यांचे हस्ते दिपप्रज्वलन करून झाला.

सर्व कलाकारांनी समरस होऊन आविष्कार अभिनय केलेल्या या प्रयोगाने प्रेक्षकांना ३ तास अक्षरशः खिळवून ठेवले. डॉक्टर हेडगेवारांच्या जीवनातील विविध प्रसंग रोमहर्षक दृश्यांसह जिवंतपणे सादर केल्या गेले. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांचे क्रांतिकारी जीवन, काँग्रेस पक्षातील त्यांचे सुभाष बाबू आणि महात्मा गांधी यांच्याशी असलेले संबंध, संघ स्थापनेची पार्श्वभूमी, गोळवलकर गुरुजींची भेट व संघामधील त्यांनी सक्रिय होण्याची आवश्यकता, संघकार्य देशभर पोहचावे यासाठी असलेली अत्यंतिक तळमळ, स्वप्नात सुद्धा भारत हे हिंदू राष्ट्र या संकल्पनांचा ध्यास घेऊन रक्ताचे पाणी कसे झाले इत्यादी प्रसंगांचे जिवंत प्रस्तुतीकरण सदर नाटकांमध्ये करण्यात आले.प्रत्यक्ष संघाची पार्श्वभूमी नसणाऱ्या काही प्रेक्षकांनी आपले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल असलेले गैरसमज दूर झाल्याची प्रांजळ प्रतिक्रिया दिली.

संघ स्थापनेची पार्श्वभूमी बघितल्यानंतर आज शिस्तबद्ध स्वयंसेवकांची फौज कुठल्याही फौज कुठल्याही आपदेच्या वेळी कशी सक्रिय होते याचे मूळ लक्षात आले. संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रात होणाऱ्या या प्रेरक नाटकाच्या प्रयोगाच्या निमित्ताने डॉ. हेडगेवार यांचे तपस्वी चरित्र घराघरात पोहोचेल हे निश्चित, असेही मत अमरावतीकर नागरिकांनी व्यक्त केले.

# ७ हजार क्विंटल ज्वारीचे २ कोटीपेक्षा अधिक चुकारे रखडले

## तिवसा तालुक्यातील शेतकरी अडचणीत



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५तिवसाः** शेतकरी राब राब शेतात राबून मोठ्या कष्टाने व कर्जबाजारी परिणामी होऊन पिकविलेल्या धान्याचे जर शासनाकडूनच वेळेत चुकारे झाले नाही, तर शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट कोलमडते. त्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. तिवसा येथील खरेदी विक्री संस्थेकडून खरेदी करण्यात आलेल्या जवळपास १५० शेतकऱ्यांच्या ७ हजार क्विंटल ज्वारीचे चुकारे रखडल्याची माहिती समोर आली असून त्यामुळे शेतकऱ्यांनी कमालीची चिंता व्यक्त केली आहे.

> शेतकऱ्यांच्या मालाची आमच्याकडून पारदर्शकरित्या धान्याची खरेदी केली जात आहे. अलीकडेच खरेदी केलेल्या ज्वारीची २ हुंडीची प्रोसेस पूर्ण करून रीतसर शासनाकडे पाठविण्यात आली आहे. निधी येताच तो शेतकऱ्यांना वितरित होईल.- **दीपक गोफने व्यवस्थापक**, खरेदी-विक्री संस्था, तिवसा-

ज्वारी या १०० दिवसांच्या पिकाला शासन हमीभाव चांगला असल्याने यंदाज्वारीचे सर्वाधिक पीक उन्हाळ्यात शेतकऱ्यांनी घेतले. तिवसा येथील खरेदी-विक्री संस्थेअंतर्गत जवळपास १५० शेतकऱ्यांची ज्वारी शासन हमीभावानुसारविहित मुदतीत नोंदणी करून खरेदी करण्यात आली होती. यासाठी आवश्यक ती कागदपत्रे शेतकऱ्यांनी पुरविली. शेतकऱ्यांना वाहतूक खर्चही खिशातून द्यावा लागला मात्रही ज्वारी खरेदी होऊन एक महिन्याचा कालावधी उलटला असूनदेखील शेतकऱ्यांचा खिसा अद्यापही रिकामाच आहे. कष्टाने पीक उभं करून खिशातला सर्व पैसा देवाणघेवाण करण्यात खर्चझाला. ज्वारीच्या उसनवारी फेडून संसारगाडा चालवायचा आणि त्याच पैशाच्या आधाराने खरीप हंगामात आणखी जोमाने पीक करायचे, अशा अनेक आशा व अपेक्षा घेऊन असलेल्या शेतकऱ्यांना ज्वारीचे पैसेच पदरात न पडल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शासन हमीभावानुसार नोंदणी केलेल्या १५० शेतकऱ्यांची ७ हजार क्विंटल ज्वारी खरेदी करण्यात आली होती. त्या हमीभावानुसार तिवसा तालुक्यात २ कोटीपेक्षा अधिक निधी शासनाकडून अप्राप्त असून हा निधी अद्यापही शेतकऱ्यांना वितरित करण्यात न आल्याने तत्काळ ज्वारीचे चुकारे करण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# पीडीएमसीत ४२ वृक्षांची विना परवानगी तोड

## महापालिकेची पीडीएमसी अधिताष्ठांना नोटीस तीन दिवसात उत्तर देण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती,**

एकीकडे शासनाकडून वृक्ष लावा, झाडे जगवा... असा संदेश देत, जनजागृती करीत वृक्षरोपण मोहिम राबविण्यात येते. एक-एक झाड लावण्यासाठी मोठी मेहनत घेतलोकांना प्रेरती केल्या जाते. मात्र त्याच वेळी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती रूग्णालय, अमरावती येथील परीसरातील ओ.पी.डी. सेक्शन जवळील ४२ वृक्ष विना परवानगी तोडकेल्याने खळबळउडाली आहे. याबाबत मनपा प्रशासनाला माहिती



मिळाल्यानंतरमनपाचे सहाय्यक आयुक्त नंदकिशोरतिखिले यांनी एसआय मिथून उसरे यांना निरीक्षण करण्यासाठी पीडीएमसीमध्ये पाठविले. यावेळी एसआय उसरे यांना ३८ अशोका वृक्ष, ०३ लहान अशोका वृक्ष व ०१ बदाम वृक्ष असे एकूण ४२ वृक्षांची तोड केल्याचे निदर्शनात आले आहे. त्यानंतर झोन नं.१ रामपुरी कॅम्पचे सहायक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांनी पीडीएमसी अधिष्ठातांना नोटीस बजावली आहे.या नागरी क्षेत्रात झाडाचे जतन कायदा १९७५ चे सेक्शन ५ च्या कलम २१, पोटकलम (१) (२) नुसारविना परवानगी वृक्षतोडण्याची कार्य वाही केली आहे. याप्रकरणी स्पष्टीकरण या कार्यालयात ०३ दिवसात सादर करावे, असे नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

# जिल्हा बँक संचालक आनंद काळे अपात्रता प्रकरण

# नोटिस न मिळाल्याचा काळेंचा दावा

## आता २३ जुलै रोजी पुढील सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आनंद काळे यांना विभागीय सहनिबंधकांनी ३० जून ३० जून रोजी अपात्रेची नोटीस बजाविली होती. त्यांना त्यांचे म्हणने मांडण्याकरिता सोमवार, १४ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु आनंद काळे यांना अपात्रेची नोटिस मिळालीच नसल्याचा दावा सोमवारी सुनावणी दरम्यान केला. मात्र विरोधकांच्या वकीलांनी याला प्रतिउत्तर दिले. दरम्यान विभागीय सहनिबंधकांनी या प्रकरणी पुढील सुनावणी २३ जुलै रोजी ठेवली आहे.

जिल्हा बँकेचे संचालक हरीभाऊ मोहोड व इतर ११ संचालकांनी २१ एप्रिल रोजी सत्ताधारी गटातील संचालक आनंद नंदकुमार काळे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ अ अन्वये कार्यवाही करण्याबाबत अर्ज सादर केला होता. ते संचालक पदावर आरूढ झाल्यापासून बँकेचे कामकाज मर्जीने व बँकेच्या हिताविरुद्ध करणे, त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल आहे. बँकेचे आर्थिक अपहार तसेच विविध प्रवास भत्त्यापोटी त्यांनी २ लाख २८ हजार ३२८ रुपयांचे बिल काढले आहे.परंतु, २१ नोव्हेंबरच्या सभेमध्ये त्यांचा खर्च नामंजूर करून सदरचा खर्च बँकेत जमा



करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे त्यांनी अनधिकृत खर्च केल्याचे सिद्ध झाल्याने याचा ठपका ठेवत विभागीय सहनिबंधकांनी त्यांना कलम ७८ अ नुसार अपात्र घोषीत करण्यात का येऊ नये, याबाबत नोटीस बजाविली आहे. त्यांना त्यांचे म्हणने मांडण्याकरिता संधी देत १४ जुलै पर्यंतची मुदत दिली होती. मात्र सोमवारी सुनावणी दरम्यान आनंद काळे यांनी नोटिस मिळालीच नसल्याचा दावा केला आहे.यावेळी विभागीय सहनिबंधक यांनी त्यांना पुन्हा ९ दिवसांची म्हणजे २३ जुलै पर्यंत म्हणने मांडण्याकरिता मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे ते २३ जुलै पर्यंत नोटिसचे उत्तर सादर करतात का, याकडे सहकार विभागाचे लक्ष लागले आहे

# महानगरपालिका शाळांच्या पटसंख्येत उल्लेखनीय वाढ, शाळांमध्ये हाऊसफुलचे फलक

## मोफत शिक्षण, दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती-** मागील काही वर्षांचे एकूणच चित्र बघता महानगरपालिका शाळांची पटसंख्या दरवर्षीच्या तुलनेने सतत वाढत असल्याचे दिसून येते. एकीकडे शहरातील खासगी अनुदानीत शाळांचे शिक्षक विद्यार्थी मिळावे यासाठी सतत फिरताना दिसून येत आहेत तर महानगरपालिकेच्या काही शाळांमध्ये हाऊसफुलचे बोर्ड लागल्याचे दिसून येत आहे. मोफत पूर्व प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था महानगरपालिकेने केल्याने गोरगरीब कुटुंबातील हजारो पालकांची त्यांच्या पाल्ल्यांच्या पूर्व प्राथमिक शिक्षणावर खर्चाची बचत होत असल्याने पालकांचा ओढा महानगरपालिका शाळांकडे वाढत आहे. या वर्षीची महानगरपालिका शाळांची एकूण पटसंख्या ११ हजार ९६२ एवढी असून मागील वर्षी सदर पटसंख्या ११ हजार ५०० एवढी होती. यंदा महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या ४६२ ने वाढली आहे. यात उर्दू शाळांसह गरीब रहिवाशांची संख्या जास्त असलेल्या परिसराचा प्रामुख्याने समावेश आहे. सद्यस्थितीत २ हजार ७३० विद्यार्थी मनपा शाळांमध्ये पुर्व प्राथमिक शिक्षणाचा लाभ घेत आहेत. ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढली त्यात मनपा उच्च प्राथ. मराठी शाळा क्र.१४, वडाळी , मनपा उच्च प्राथ. मराठी शाळा क्र. १७, विलास नगर, मनपा उच्च प्राथ.हिंदी शाळा क्र.७, विलास नगर, मनपा उच्च प्राथ. हिंदी शाळा



क्र.११, भाजी बाजार, मनपा हिंदी प्राथमिक शाळा क्र.१२, नागपुरी गेट, मनपा उर्दू शाळा क्र.७, मुजफ्फरपुरा, मनपा उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्र.८, जमील कॉलनी, मनपा उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्र.९, नूर नगर, मनपा उर्दू उच्च प्राथ. शाळा क्र.१०, बडनेरा, मनपा.उर्दू उच्च प्राथ. शाळा क्र.१२, लालखडी, मनपा उर्दू प्राथ. कन्या शाळा क्र.३, बडनेरा, मनपा उर्दू उच्च प्राथ. शाळा आयएमएस, मनपा मराठी उच्च प्राथ. शाळा बेनोडा, मनपा हिंदी मुलींची माध्यमिक शाळा, नागपुरीगेट, मनपा हिंदी मुलांची माध्यमिक शाळा, तालाबपुरा, मनपा मराठी माध्यमिक मुलांची शाळा वडरपुरा या शाळांमध्ये हाऊसफुलचे बोर्ड लावण्याची वेळ शाळा मुख्याध्यापकांवर आली आहे.

> महानगर पालिकेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत शिक्षणासह दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा दिल्या आहेत. तसेच शाळांची स्थिती आधीच्या तुलनेत सुधारण्यात आली असून मनपा आयुक्तांनी जातीने मनपा शाळांची दुरुस्ती, सुधारणेकडे लक्ष दिल्याने मनपा शाळांमध्ये पटसंख्या वाढत आहे.
>
> **- डॉ. प्रकाश मेश्राम,** शिक्षणाधिकारी, मनपा.

# ’डॉ. पंजाबराव देशमुख लिखित धर्माचा वैदिक वाययातील उदय आणि विकास’ विशेष व्याख्यान १७ जुलैला

## डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राच्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख ऑक्सफर्ड यांनी विद्यापीठात डी. फिल. पदवीसाठी केलेल्या संशोधनाच्या शताब्दी निमित्ताने १७ जुलै, रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार इतिहास संशोधन केंद्र येथे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष तथाविद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य



डॉ. हर्षवर्धन देशमुख उपस्थित राहतील. प्रमुख वक्ते म्हणून पुणे येथील धर्म व तत्त्वज्ञानाचे जेष्ठ अभ्यासक डॉ. प्रदीप गोखले हे ’डॉ. पंजाबराव देशमुख लिखित धर्माचा वैदिक वाययातील उदय आणि विकास’ यावर अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. सर्वांनी डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राच्यावतीने आयोजित व्याख्यानास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

# जिल्हा परिषद उर्दु शाळेचे विद्यार्थी धडकले गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या दालनात

## जिल्हा परिषद उर्दु शाळेच्या पाचव्या वर्गाला मान्यता द्या नारायणपूर (कापुसतळणी ) येथील पालकांसह विद्यार्थ्यांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील नारायणपूर कापुसतळणी जिल्हा परिषद उर्दु शाळेत शैक्षणिक वर्षात इयत्ता एक ते चौथीचे वर्ग सुरू असून पुढील पाचवीच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना कापुसतळणी येथे जावे लागत आहे. कापुसतळी येथे जात असताना विद्यार्थाना बिटू नाला ओलांडून जावे लागते काही वर्षांपूर्वी बिटू नाल्याच्या पुरा मध्ये वाहून जाऊन दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. नारायणपूर येथे पाचव्या वर्गाच्या विद्यार्थाची पुर्ण संख्या आहे. नारायणपूर येथे पाचवा वर्ग नसल्यामुळे विद्यार्थांना इतरत्र खाजगी किंवा इतर शाळेत जावे लागते त्यामुळे गरीब व गरजू पालकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. नारायणपूर येथील जिल्हा परिषद उर्दु शाळेतील पहिली ते चौथी पर्यंत शाळेतील पटसंख्या विचारात घेता तसेच विद्यार्थ्यांची सोय लक्षात घेऊन विद्यार्थ्यांची नाल्याच्या पुरामुळे जिवीत हानी टाळून नारायणपूर येथे जिल्हा परिषद उर्दु शाळेत या वर्षीच २०२५- २६ पाचवा वर्ग सुरू करणे आवश्यक आहे तसेच गावातच दर्जेदार शिक्षण मिळेल यासाठी नारायणपूर येथील पालकांसह विद्यार्थी गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे. या आगोदर जिल्हा परिषद उर्दु शाळेच्या वर्ग पाचवीला मान्यता देण्यात आली होती. पंचायत समितीलशिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना चुकीचा अहवाल पाठवुन मान्यता रद्द करण्यात आल्याचा आरोपही पालकांनी केला. गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या दालनात या वेळी पालकांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लागा निवडणुकीच्या तयारीला ...

## मतदारसंघांचे प्रारूप जाहीर

## २१ जुलैपर्यंत हरकती स्वीकारल्या जाणार






**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती–** जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकीने चांगलाच वेग घेतला असून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज, सोमवार, १४ जुलै रोजी मतदारसंघांचे प्रारूप (रचना) जाहीर केले. या प्रारूप यादीवर येत्या २१ जुलैपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. सदर प्रशासकीय घडामोडीमुळे जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांच्या हालचालींनाही वेग आला आहे. उमेदवारांची चाचपणी व इतर बाबी पूर्ण करण्यासाठी प्रमुख पदाधिकारी कामाला लागले आहेत.

जिल्हा परिषदेच्या निवडणुका २०१७ च्या सूत्रानुसार घेण्याचे यापूर्वीच ठरविण्यात आले आहे. त्यामुळे मतदारसंघांची ५९ ही संख्या कायम असली तरी काही मतदारसंघांची नावे बदलली आहेत. त्याचवेळी अचलपूर तालुक्यात एक मतदारसंघ वाढला असून चांदूर रेल्वे तालुक्यातील एक मतदारसंघ कमी झाला आहे. यापैकी कुठल्याही बाबीवर हरकत घ्यायची असेल किंवा काही बदल सुचवायचा असेल तर नागरिकांना २१ जुलैपर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडे आपले म्हणणे लेखी स्वरुपात दाखल करता येईल.

अशाप्रकारे प्राप्त हरकती व सूचनांचा आधार घेऊन जिल्हाधिकारी २८ जुलै रोजी विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव सादर करतील. दरम्यानच्या काळात स्वत: विभागीय आयुक्त नागरिकांच्या सूचना व तक्रारींवर ११ ऑगस्टपर्यंत सुनावणी घेतील, आणि त्या आधारे तपशिलांमध्ये आवश्यक तो बदल करुन पुन्हा ही यादी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी या नात्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करतील. त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी मतदारसंघांची अंतिम रचना घोषित करतील.

जिल्हा परिषदे सोबतच जिल्ह्यातील सर्व १४ पंचायत समित्यांच्या मतदारसंघांचीही रचना अधिसूचनेनुसार घोषित करण्यात आली आहे. जिल्हाभरात पंचायत समित्यांचे एकूण ११८ मतदारसंघ आहेत. या मतदारसंघात समाविष्ट गावे, त्याच्या सीमा आदी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभाग आणि जिल्हा परिषद मुख्यालयासह प्रत्येक पंचायत समिती कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या माहितीच्या आधारेच नागरिकांना सूचना व हरकती सादर करता येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी सदर यादीचे अवलोकन करुन २१ जुलैपर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा परिषद निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या निवडणुका २०१७ च्या सूत्रानुसार घेण्याचे यापूर्वीच ठरविण्यात आले आहे. त्यामुळे मतदारसंघांची ५९ ही संख्या कायम असली तरी काही मतदारसंघांची नावे बदलली आहेत. त्याचवेळी अचलपूर तालुक्यात एक मतदारसंघ वाढला असून चांदूर रेल्वे तालुक्यातील एक मतदारसंघ कमी झाला आहे. यापैकी कुठल्याही बाबीवर हरकत घ्यायची असेल किंवा काही बदल सुचवायचा असेल तर नागरिकांना २१ जुलैपर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडे आपले म्हणणे लेखी स्वरुपात दाखल करता येईल.

अशाप्रकारे प्राप्त हरकती व सूचनांचा आधार घेऊन जिल्हाधिकारी २८ जुलै रोजी विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव सादर करतील. दरम्यानच्या काळात स्वत: विभागीय आयुक्त नागरिकांच्या सूचना व तक्रारींवर ११ ऑगस्टपर्यंत सुनावणी घेतील, आणि त्या आधारे तपशिलांमध्ये आवश्यक तो बदल करुन पुन्हा ही यादी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी या नात्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करतील. त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी मतदारसंघांची अंतिम रचना घोषित करतील.

जिल्हा परिषदेसोबतच जिल्ह्यातील सर्व १४ पंचायत समित्यांच्या मतदारसंघांचीही रचना आजच्या अधिसूचनेनुसार घोषित करण्यात आली आहे. जिल्हाभरात पंचायत समित्यांचे एकूण ११८ मतदारसंघ आहेत. या मतदारसंघात समाविष्ट गावे, त्याच्या सीमा आदी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभाग आणि जिल्हा परिषद मुख्यालयासह प्रत्येक पंचायत समिती कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या माहितीच्या आधारेच नागरिकांना सूचना व हरकती सादर करता येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी सदर यादीचे अवलोकन करुन २१ जुलैपर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा परिषद निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे यांनी केले आहे.

# सिमेंट पोल घेऊन जाणारा ट्रॅक्टर उलटला, १ ठार, ५ जखमी

## मोर्शीच्या वरला फाट्यानजीक अपघात



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती –** वीज वितरणासाठी वापरण्यात येणारे सिमेंटचे खांब घेऊन जात असलेला ट्रॅक्टर अचानक उलटून झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत. जखमींना मोर्शीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी चार जणांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. हा अपघात सोमवार १४ जुलै रोजी दुपारी मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरला फाट्यानजीक घडली. अनिकेत सुनील मुंदाफळे (वय २६) रा. आष्टगाव असे मृताचे नाव आहे.प्राप्त माहितीनुसार मोर्शी ते चांदूरबाजार रोडवर असलेल्या आष्टगाव गाव येथून मजूर सचिन धनू लोखंडे (वय २९ वर्षे), रोशनशामराव धारवाडे (वय २७ वर्षे), रोशन लंगडाजी कासदेकर (वय २२ वर्षे), दीपक गणेश भोकरे (वय २३ वर्षे) सर्व रा. बैलमंडी तसेच अनिल महेश जानवंशी (वय ३२ वर्षे) व अनिकेत सुनील मुंदाफळे २६ वर्षे)दोघेही रा. आष्टगाव हे आष्टगाव येथून महिद्रा ट्रॅक्टर क्र.एम.एच.२७/ डी.एल. ०४७२ यामध्ये सिमेंटचे इलेक्ट्रिक खांब लावण्यासाठी बेलोरा येथे जात असतांना अचानक वरला ते आष्टगावच्या मध्यभागी ट्रॅक्टर उलटला.या अपघातात अनिकेत सुनील मुंदाफळे याचा जागीच मृत्यू झाला. इतर गंभीर जखमींना आष्टगावचे सरपंच दर्शन माल्हा व बंडू साउथ यांच्या वाहनातून मोर्शीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींवर उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रथमोपचार करून जखमींपैकी सचिन धनू लोखंडे, रोशन शामराव धारवाडे, रोशन लंगडाजी कासदेकर, अनिल महेश जानवंशी यांची प्रकृती चिताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आले.दीपक गणेश भोकरे यांना किरकोळ मार असल्यानेत्यांचा उपचार उपजिल्हा रुग्णालय येथे सुरू आहे. या झालेल्या भीषण अपघातात जखमींना तानाजी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल पंडागरे, रवी परतेती, स्वप्निल फुके व आष्टगाव येथील ग्रामवासी यांची मदत मिळाली. मोर्शीचे ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करीत आहे.–

## जनावरांच्या वाहतुकीसाठी लढविली शक्कल

# एका कम्पार्टमेंटमध्ये तनसाचे पोते तर दुसऱ्या भागात गोवंशीय जनावरे

## मोर्शी पोलीस व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पकड़ला ट्रक




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ मोर्शी–** ट्रकमध्ये कम्पार्टमेंट टाकून एका भागात गोवंशीय जनावरे तर दुसऱ्या कम्पार्टमेंटमध्ये तनसाचे पोते भरून प्रथमदर्शनी दिसणाऱ्या तनसाच्या पोत्याच्या आड गोवंशीय जनावरांची चोरटी वाहतूक करण्याचा धक्कादायक प्रकार मोर्शी–चांदूरबाजार मार्गावरील वरला फाटा येथे उघडकीस आला.पोलीस व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पाठलाग करून पकडलेल्या ट्रकमधून गोवंशीय ४३ जनावरांची सुटका केली. त्यात नऊ जनावरे गुदमरून मृत्युमुखी पडलेली होती. मध्यप्रदेश येथून जनावरे कत्तलीसाठी आणण्याचा गोरखधंदा दिवसेंदिवस वाढत चालला असून आयशर ट्रकमधून (क्र.एम एच ४० सिटी ४८११) ४३ गोवंशीय जनावरे मोर्शी येथून चांदूरबाजारकडे असल्याची गोपनीय माहिती मोर्शी पोलीस व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना प्राप्त झाली. त्यानुषंगाने पोलिसांनी ट्रकचा पाठलाग केला. संबंधित ट्रक वरला फाटा येथे अडवून ट्रकची पाहणी केली तेव्हा मागील कम्पार्टमेंटमध्ये तनसाचे पोते होते. त्यानंतरच्या दुसऱ्या कम्पार्टमेंटमध्येगाय, कालवड, गो–हे, अशी एकूण ४३ जनावर होती. जनावरांना ट्रकसह चारा पाण्यासाठी केकतपूर येथील गौरक्षणमध्ये नेण्यात जनावरांना खाली काढत असतांना आले. त्यातील ९ जनावरे दगावल्याचे आढळले. सिद्दिकी रईस खान व इसुफ कुरेशी आरिफ कुरेशी (रा. मध्यप्रदेश) अशी पकडलेल्यांची नावे आहेत.महाराष्ट्र शासनाने गोवंश हत्याबंदीचा कायदा असताना सुद्धा कायद्याला धाब्यावर बसवून मध्यप्रदेश येथून गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक सुरू असल्याबद्दल गोरक्षकांनी संताप व्यक्त केला. त्याविरुद्ध कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी गोरक्षकांनी केली. याप्रकरणी वाहन चालकांविरुद्ध गोवंश प्रतिबंधक कायद्या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांच्या नेतृत्वात फौजदार कुमावत, आकाश शिवणकर, तुषार चव्हाण, कर्मचारी छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे यांनी केली.

# युरियाच्या टंचाईमुळे शेतकरी अडचणीत

## चिखलदरा तालुक्यातील कृषी केंद्रांवर युरियाचा तुटवडा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५चिखलदरा–** खरिप पेरण्यानंतर पीक जोमात असताना चुरणी परिसरातील शेतकऱ्याना युरिया खतांचा तुटवडा असल्यामुळे शेतकऱ्यांची दमछाक होत आहे. पावसामुळे शेतकऱ्यांची लगबग वाढली आहे; मात्र परिसरात मका पेरा जास्त प्रमाणात झाला आहे. युरिया खतांची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. या टंचाईमुळे शेतकरी चिंतेत आहेत. तालुका कृषी अधिकारी यांनी तातडीने लक्ष देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य दरात खत मिळत नाही आणि काळाबाजार वाढत असल्याचीही चर्चा शेतकरी करत आहे आणि चिखलदरा तालुक्यातील मंडळातील कृषी केंद्रावर युरिया खत उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. यंदा मक्याची लागवड मोठ्या प्रमाणात झाली असून, पीक वाढीसाठी अत्यावश्यक असलेल्या युरियासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. युरिया मिळवण्यासाठीशेतकरी दिवसेंदिवस कृषी केंद्रावर चकरा मारत आहेतः मात्र युरिया उपलब्ध होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.मका पिकासाठी वेळेवर खत मिळाले नाही, तर उत्पादनात मोठे नुकसान होणार आहे, अशी चिंता शेतकरी व्यक्त करत आहेत. या परिस्थितीत चुरणी मंडळातील कृषी अधिकारी गप्प का आहेत? असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. जर लवकरात लवकर युरिया उपलब्ध झाला नाही, तर संबंधित कृषी मंडळ अधिकाऱ्या 'वर कारवाईकरण्यात यावी, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

> शनिवारी जिल्हाधिकाऱ्यांशी यासंदर्भात चर्चा झाली. दोन दिवसात युरिया उपलब्ध होईल व कृषी अधिकारी हे ज्या ठिकाणी युरिया नाही, त्यांना उपलब्ध करून देणार आहेत.
>
> **केवलराम काळे,** आमदार, मेळघाट विधानसभा.

# झेडपी कर्मचारी व शिक्षकांच्या सेवापुस्तिका झाल्या ऑनलाइन

## केव्हाही पाहता येणार सेवापुस्तक अद्ययावत करण्याचे सीईओंचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती :**जिल्हा परिषदेचे संपूर्ण कामकाज आता डिजिटल होत असताना या भर म्हणून जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत सर्व कर्मचारी व शिक्षकांना त्यांच्या वैयक्तिक सेवापुस्तकातील नोंदी आता ऑनलाइन पाहता येणार आहे. यासाठी सेवापुस्तक अद्यावत करण्याचे व्यापक अभियान सुरूकरण्यात आले आहे.सामान्य प्रशासन विभागामार्फत प्राप्त आदेशानुसार, प्रत्येक कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक अचूक व अद्ययावत असणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून पदोन्नती, वेतनवाढ, निवृत्तीवेतन इत्यादी सेवा लाभांमध्ये विलंब अथवा अडथळे निर्माण होणार नाहीत. या संदर्भात प्रशासकीय सुसूत्रता व पारदर्शकता राखण्यासाठीआता प्रत्येक कर्मचारी व शिक्षक स्वत:च्या सेवापुस्तकातील अद्ययावत नोंदी ऑनलाइन पोर्टलवर पाहू शकतील, अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार, सर्व विभाग प्रमुख, गटविकास अधिकारी व कार्यालय प्रमुख यांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके तपासून जेथे आवश्यक असेलतेथे माहिती अद्ययावत करून संबंधित पोर्टलवर अपलोड करण्यात यावी, अशा सूचना सीईओ संजिता महापात्र यांनी दिल्या आहेत. या सुविधेमुळे कर्मचारी व शिक्षक यांना सेवासंबंधी कोणतीही नोंद तपासण्यासाठी कार्यालयात वारंवार धावपळ करण्याची गरज भासणार नाही, तसेच वेळेवर वेतन व इतर लाभ मिळविण्यासही मदत होईल.



# अचलपूर तालुक्यात २ पंचायतसमिती सर्कल वाढले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अचलपूर :**

तालुक्यात २ पंचायतसमिती सर्कल वाढले असल्याने राजकारणात अधिकच रंगत वाढणार आहे.अचलपूर तालुका प्रतिनिधीने दिलेल्या माहितीनुसार धामणगाव गढी पंचायतसमिती सर्कलमध्ये धामणगाव गडीसह खरपी, निमदरी, वझ्झर, पिंपळखुटा, देवगाव, हनवतखेडा, एकलासपूर, खरपी सर्कलमध्ये खरपी, पांढरी, म्हसोना, मल्हारा, सालेपूर, निमकुंड, कोठारा, बेलखेडा, कांडली सर्कलमध्ये कांडली, तर कविठा बु. सर्कलमध्ये कविठा बु., अंबाडा, घोडगाव, खेलदेवमाळी, नारायणपूर, जवर्डी, भूगाव, रामापूर बेलज, धोतरखेडा सर्कलमध्ये गौरखेडा,धोतरखेडा, दर्याबाद, सावळी दातुरा, वडगाव फ. सर्कलमध्ये खांजमानगर, हरम, भिलोना, चमक बु, चमक खुर्द, नायगाव, परसापूर सर्कलमध्ये परसापूर, कासमपूर, उपातखेडा, रामापूर बु, वाघडोह, जवळापूर, पथ्रोट सर्कलमध्ये पथ्रोट, शिंदी सर्कलमध्ये शिंदी बु., काकडा, तुळजापूर जहाँ., टवलार, रासेगाव सर्कलमध्ये कोल्हा, येवता, कुष्टा बु, कुष्टा खुर्द, इसापूर, वडनेर भुजंग, बळेगाव, चौसाळा, बोपापूर सर्कलमध्ये बोरगाव दोरी, वासनी बु., वासनी खुर्द, दोनोडा, निजामपूर, खैरी, बोर्डी, सावळी बु., बोपापूर, बोरगाव पेठ, असदपूर सर्कलमध्ये असदपूर शहापूर, निभारी, सावळापूर, येसुर्णा, येलकी, हिवरापूर्णा या गावांचा समावेश आहे.

## पिण्याच्या टाकीत शेवाळयुक्त घाण, सार्वजनिक शौचालयाची दुरवस्था

# गुरुकुंज मोझरी बसस्थानक बनले समस्यांचे माहेरघर




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५गुरूकुज मोझरी :** येथील बसस्थानक हे सध्यस्थितीत अनेक समस्यांचे माहेरघर बनले असून येथील परिसरात असलेल्या पिण्याच्या टाकीची गेल्या कित्येक महिन्यांपासून स्वच्छता नसून, तेथील पाण्यावर शेवाळयुक्त थर साचला असून, येथील परिसरात स्वच्छतेअभावी घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

पिण्याच्या टाकीत पाणीच नसल्याने दूरवरून प्रवास करून बसस्थानक येणाऱ्या अनेक प्रवासीवर्गांना इतरत्र पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे चित्र सद्यस्थितीत दिसून येत आहे, तर दुसरीकडे परिसरातीलच सार्वजनिक शौचालयात प्रचंड घाण साचली असून नियमित प्रवास करणाऱ्या प्रवासी तसेच महिलावर्गांची कुचंबना होत असल्याचे दिसून येत आहे. या सर्व प्रकारावर गुरुकुंज मोझरी बसस्थानक नियंत्रण विभागाने कमालीचे दुर्लक्ष केल्याने अखेर सफाई व देखरेख विभागावर नियंत्रण कुणाचे, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

नव्यानेच लोकार्पण झालेल्या गुरुकुंज मोझरी बसस्थानकाची स्वच्छता व सुरक्षितता याकडे दुर्लक्ष होत असून, कोट्यावधी रुपये खर्चुन तयार करण्यात आलेल्या बसस्थानक परिसरातील सोईसुविधा युक्त भव्य वास्तू स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही जबाबदारी अखेर कुणाची, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.गुरुकुंज मोझरी वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी असून येथे दैनंदिन शेकडो प्रवासी व भाविकांची रेलचेल या ठिकाणी पहावयास मिळते, तसेच मोझरी विकास आराखडा मंजुरीकरिता येथील लोकप्रतिनिधी यांनी अथक प्रयत्न करून डोळ्यातील पारणे फेडणारा विकास या क्षेत्रात घडवून आणला. त्या भव्य वास्तूच्या सुरक्षितता व स्वछता याचा विसर येथील एस. टी. महामंडळातीलबसस्थानक येथे नियंत्रण व्यवस्थापन विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिसून येत आहे. एकंदरित समस्यांचे माहेर घर असलेल्या मोझरी बसस्थानकातील प्रकार तर दुसरीकडे होत असलेले येथील कर्मचारी वर्गाचे दुर्लक्ष यावर नियंत्रण विभाग व वरिष्ठ पदाधिकारी लक्ष देतील काय, याकडेच प्रवासी वर्गाचे लक्ष लागले आहे.

> बसस्थानक परिसरातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. यामुळे रात्रपाळीत लाईन व पाण्याची समस्या निर्माण होत आहे. यासंदर्भात वरिष्ठांना रीतसर तक्रार केली असून लवकरच दुरुस्ती करण्यात येईल.
>
> **भूमेश्वर मानकर,**वाहतूक नियंत्रक, बसस्थानक गुरुकुज मोझरी.

# राष्ट्रीय महामार्ग रोखून धरल्या प्रकरणी यवतमाळच्या महागांव पोलिसात बच्चू कडू सह १२ जणांवर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५यवतमाळ–** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर आवाज उठवत सरकारला धारेवर धरण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहे. दरम्यान माजी मंत्री बच्चू कडूंच्या पदयात्रेने सध्या महाराष्ट्र ढवळून निघालाय. आशातच आता बच्चू कडूंच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण राष्ट्रीय महामार्ग रोखून धरल्या प्रकरणी बच्चू कडूंसह १२ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यवतमाळच्या महागांव पोलिसात बच्चू कडू सह १२ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, बच्चू कडू यांच्या पदयात्रेची समारोपीय सभा श्री गजानन महाराज मंदिर आंबोडा येथे नियोजित होती. मात्र ऐनवेळी आयोजकांनी व बच्चू कडू यांनी समारोपीय सभा आंबोडा उडान पुलावर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर आयोजित केली. ट्रॅक्टर महामार्गवर आडवे लावून वाहतूक पूर्णपणे बंद केली होती. याप्रकरणी बच्चू कडूंसह आयोजकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समारोप सभा घेतल्याने तब्बल तीन तास दोन्ही बाजुची वाहतुक ठप्प झाली होती. त्यामुळे माजी मंत्री बच्चू कडूनसह १२ जणांवर महागाव पोलिसात राष्ट्रीय महामार्ग रोखून धरल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय.

### पोलिसांचे नेमकं म्हणणं काय?

आंबोडा येथील श्री गजानन महाराज मंदिर ग्राम या ठिकाणी सातबारा कोरा यात्रा समारोपीय सभा नियोजित होती. परंतु ही पदयात्रा आंबोडा गावात दुपारच्या सुमारास नागपूर ते तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर पोहोचली. या पदयात्रेमध्ये बच्चू भाऊ कडू यांचे नेतृत्वात ५००० ते ७००० जनसमुदाय उपस्थित होता. यासह ३० ते ४० ट्रॅक्टर होते. यातील जमाव राष्ट्रीय महामार्ग खडका ते आंबोडापर्यंत दोन्ही बाजूनी चालत होता. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक ठप्प झाली होती. त्यांना वारंवार पोलीस निरीक्षक आणि इतर अधिकारी यांनी महामार्गाच्या एका बाजूने चला, असे वारंवार सांगितले. तरी सुद्धा त्यांनी ऐकले नाही. तसेच ही पदयात्रा समारोपीय सभा श्री गजानन महाराज मंदिर आंबोडा येथे नियोजित असताना एनवेळी आयोजकांनी व बच्चुभाऊ कडू यांनी समारोपीय सभा आंबोडा उडान पुलावर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर आयोजित केली व ट्रॅक्टर महामार्ग यावर आडवे लावून वाहतूक पूर्णपणे बंद केली.

तसेच पदयात्रा संबंधाने आयोजकांनी कुठलेही कायदेशीर परवानगी घेतली नाही. परिणामी, आयोजकांनी बेकायदेशीर जमाव जमवून नियोजित ठिकाणी सभा न घेता ग्राम अंबोडा येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील अंबोडा उड्डाण पुलावर ट्रॅक्टर आडवे करुन व ५००० ते ७००० लोकांना राष्ट्रीय महामार्गाच्यामध्ये बसवुन वाहतुक थांबविली. तसेच प्रतिबंधक आदेशाचे उल्लघंन केले. या प्रकरणी कलम १२६(२), १८९(२), २२३ भारतीय न्याय संहीता सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.



# सण आले की जिभेची मजा ; मात्र भेसळीचा धोका ओळखा, अन्न सुरक्षेला जाग येणार कधी?

## खाद्यपदार्थांची मागणी वाढणार; सुरक्षेच्या दृष्टीने तपासणी करणे गरजेचे

**अरुण जोशी**

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१५अमरावती–** जुलै महिन्यापासून विविध धार्मिक सणांना सुरुवात होत आहे. या अनुषंगाने खाद्यपदार्थाच्या मागणीत वाढ होते. त्यामुळे अन्न सुरक्षेच्या दृष्टीने यंत्रणेने तपासणी करणे गरजेचे आहे. सण, उत्सव काळात उपवास, व्रत, पूजाअर्चा आणि सामूहिक कार्यक्रमांमुळे बाजारपेठेत खाद्यपदार्थाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. परिणामी अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, तसेच रस्त्यावरच्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून विविध प्रकारचे उपवासाचे पदार्थ, फरसाण, मिठाई, थंडपेय यांची विक्री केली जाते. मात्र, या ठिकाणी अन्न सुरक्षा मानकांचे पालन होत असल्याची खात्री प्रशासनाकडून केली जात नसल्याने नागरिकांच्या



आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याचा धोका निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व औषधी प्रशासन, तसेच आरोग्य विभागाने वेळीच खबरदारी घेणे आवश्यक आहे; परंतुअद्याप पर्यंत अमरावती शहरात तरीहॉटेल्स, खाद्य विक्रेत्यांकडील अन्नपदार्थाची तपासणी, नमुने संकलन किंवा जागरूकता मोहीम राबविण्यात आली नसल्याचे निदर्शनास येत आहे.येणाऱ्या दिवसांत सण, उत्सव साजरे होणार आहेत. या काळात उपवासात फराळासाठी लागणाऱ्या पदार्थांसह इतर पदार्थांचीही मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. मिठाई विक्रेते, हॉटेलवर या काळात गर्दी दिसून येते.

> जिल्ह्यात अन्न तपासणीची स्थिती काय ?अमरावती शहरासह ग्रामीण भागातील हॉटेल्स, स्टॉल्स, मिठाई दुकाने याठिकाणी धडक तपासण्या करून सणांच्या काळात नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावे यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावीत. तसेच दोषीविरुद्ध कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.–

# कुपोषणग्रस्त जिल्ह्यातील पोषण आहार वाटपाची एफडीएमार्फत तपासणी व्हावी

## आ. संजय खोडके यांनी वाढत्या कुपोषणाच्या परिस्थितीवर लक्षवेधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती** –कुपोषण निर्मूलनासाठी शासनाच्या अनेक योजना व उपाययोजना राबविल्या जात असताना स्थिती मात्र 'जैसे थे'च आहे. राज्यातील १४ कुपोषणग्रस्त तालुक्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्याचा विचार केला तर राज्यातील १२ तालुक्यांच्या एकत्रित आकडेवारीपेक्षाही दुप्पट कुपोषण वाढ ही अमरावती जिल्ह्यात झालेली दिसून येते. या भीषण परिस्थितीकडे आ. संजय खोडके यांनी विधानपरिषदेतून शासनाचे लक्ष वेधले व उपाययोजना करण्याची सूचना केली.

अधिवेशनामध्ये सोमवारी सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सभागृहात कामकाजादरम्यान महिला व खाल विकाससंदर्भात सुरू असलेल्या लक्षवेधी चर्चेमध्ये आ. खोडके यांनी अमरावती भागातील कुपोषणाच्या या मुद्दयावर लक्ष वेधले. दरम्यानच्या काळात कुपोषणाच्या बाबतीत १४ समित्यांनी काम केले व सुधारणा करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, कुपोषणाची परिस्थित तशीच आहे. शासनाच्या आकडेवारीनुसार कुपोषणाची तीव्रता कमी झाली असली तरी मातामृत्यु, बालमृत्यू व कुपोषणाच्या बाबतीत प्रश्न अजूनही कायम असल्याचे सांगून आ.



संजय खोडके यांनी कुपोषणाच्या उपाययोजनासंदर्भात अनेक शंका– कुशंका व्यक्त केल्या, प्रामुख्याने अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्यात कुपोषणसंदर्भात सभागृहाला अवगत करताना त्यांनी कुपोषणग्रस्त भागातील अंगणवाडी असो अथवा आरोग्य केंद्रामध्ये जो पोषण आहार पोहोचविला जातो, तो नियमित व वेळेवर पोहोचविण्यात येतो का? तो पोषण आहार सकस, चांगल्या पद्धतीचा व दर्जेदार असल्याची खात्री पटविण्यासाठी त्या आहाराची 'एफडीए'मार्फत नियमित तपासणी अथवा चौकशी करण्यात आली का? त्यावरून पोषण आहाराची गुणवत्ता कळणार असल्याचे सांगून आ. संजय खोडके यांनी प्रश्न उपस्थित केला.

# सरकारी कॅन्टीनमध्ये पदार्थांमध्ये असलेल्या तेल आणि साखरेच्या प्रमाणाचे फलक लावणे आता बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती**

सरकारी कॅन्टीनमध्ये पदार्थांमध्ये असलेल्या तेल आणि साखरेच्या प्रमाणाचे फलक लावणे बंधनकारककेंद्र सरकारच्या कार्यालयांमधील कॅन्टीनमध्ये आता कर्मचाऱ्यांची गर्दी कमी होण्याची शक्यता आहे. कारण, आदेश आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने सर्व केंद्रीय कार्यालये, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेसह (एम्स) सर्व रुग्णालये आणि शिक्षण संस्थांना त्यांच्या कॅन्टीनमध्ये मिळणाऱ्या सामोसा, कचोरी, गुलाबजाम यांसारख्या पदार्थांमध्ये असलेल्या तेल आणि साखरेच्या प्रमाणाचे फलक लावण्याचे आदेश दिले आहेत. लठ्ठपणावर नियंत्रण मिळवण्यासाठी उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.



### पंतप्रधानांच्या 'फिट इंडिया'चे पुढचे पाऊल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जानेवारी २०२५ मध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धाच्या उद्घाटन प्रसंगी 'फिट इंडिया' मोहिमेचा उल्लेख करत नागरिकांना सक्रिय आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन केले होते. 'मन की बात'मध्ये त्यांनी तेलाचा वापर १० टक्के कमी करण्याचे आवाहन केले होते. याची सुरुवात आता केंद्र शासनाच्या कॅन्टीनमधून झाल्याचे बोलले जात आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार, शहरी भागातील पाचपैकी एक प्रौढ व्यक्ती लठ्ठपणाने ग्रस्त आहे. 'द लान्सेट जीबीडी २०२१'च्या अभ्यासामध्ये असे म्हटले आहे की, २०२१ मध्ये भारतातील लठ्ठ आणि जास्त वजन असलेल्या प्रौढांची संख्या १८ कोटी होती, जी २०५० पर्यंत ४४.९ कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. यामुळे भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर असेल. लठ्ठपणामुळे हृदयविकार, उच्च रक्तदाब, मधुमेह, उच्च कोलेस्ट्रॉल आणि वंध्यत्व यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लठ्ठपणा साथीच्या रोगाप्रमाणे वेगाने पसरत आहे, ही चिंताजनक बाब आहे.

### एका गुलाबजाममध्ये पाच चमचे साखर

ज्येष्ठ मधुमेहतज्ज्ञ डॉ. सुनील गुप्ता यांनी एका उदाहरणातून या फलकांच्या गरजेवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, गुलाबजाम समोर आला की, आपण कुठलाही विचार न करता खाऊन घेतो. परंतु, अनेकांना हे माहीत नसते की, एका गुलाबजाममध्ये जवळपास पाच चमचे साखर असते. त्यामुळे खाद्यपदार्थ खाताना असे फलक आरोग्याचा इशारा देणारे ठरतील.

### 'तेल–साखर बोर्ड'ची अशी असेल संकल्पना

या पार्श्वभूमीवर, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सर्व केंद्रीय संस्थांना त्यांच्या कॅन्टीनमधील खाद्यपदार्थांखाली त्यात असलेले तेल आणि साखरेच्या प्रमाणाचे बोर्ड लावण्याचे आदेश दिले आहेत. या 'आरोग्य बोर्ड'मुळे खाद्यपदार्थांमध्ये लपलेली चरबी आणि साखर उघड होईल, ज्यामुळे ग्राहक अधिक जागरूक होतील.

# अकोली–साईनगर रस्ता आणि अंडरपास कामांची आ. रवी राणा यांच्याकडून पाहणी; थर्ड पार्टी ऑडिटचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती**

अमरावती मनपा क्षेत्रातील अकोली–साईनगर रस्त्याच्या १९ कोटी रुपये खर्चाच्या काँक्रिटीकरण आणि अकोली (४ कोटी) व भातकुली (५ कोटी) अंडरपास बांधकामांची पाहणी आमदार तथा महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष रवी राणा यांनी मनपा आयुक्त सौम्या शर्मा–चांडक, रेल्वे अधिकारी आजाद आणि संबंधित अधिकाऱ्यांसह केली. पाहणीदरम्यान रस्त्यांच्या कामात त्रुटी आणि अपूर्णता आढळल्याने आ. राणा यांनी थर्ड पार्टी एजन्सीमार्फत गुणवत्ता तपासणीचे निर्देश दिले.

भातकुली अंडरपासबाबततातडीने निर्णय घेण्यासाठी आ. राणा यांनी स्पॉटवरूनच डीईएन भुसावळ यांच्याशी संवाद साधत तांत्रिक आणि प्रशासकीय पातळीवर विशेष बैठक घेण्याच्या सूचना दिल्या. साईनगर, अकोली आणि भातकुलीपरिसरातील नागरिक आणि महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी रस्ते, नाले आणि साफसफाईची पाहणी करत पावसाळी उपाययोजनांचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. या पाहणीत मनपा शहर अभियंता पवार,उपअभियंता तावडे,



जेडीटीवी कार्यकारी अभियंता एम.जी.पी., महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अधिकारी आणि युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी सुनील राणा, सचिन भेंडे, उमेश ढोणे, शैलेंद्र कस्तुरे, श्याम कथे, प्रशांत कावरे, राजू तेलखडे, नरेश अतकरे, योगेंद्र खोजरे, गणेश गतफने, प्रदीप गडेकर, देवचंद शेंडे, दिनेश ठाकरे, भारत येवले, संजय सोहनी, राजेश मिश्रा, गजानन बोंडे, अजय जयस्वाल, गजेंद्र बोंडे, सतीश मिश्रा, कमलकिशोर मलानी, आशिष कावरे, बंडू डकरे, देवानंद राठोड, आशिष पांडे, गणेशदास गायकवाड, पराग चीमोटे, भूषण पाटणे, अविनाश काळे, शुभम उंबरकर, पद्माकर गुल्हाने आदी उपस्थित होते.

# अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यकारणी मंडळ लवकरच बरखास्त होणार?

## सचिव दीपक विजयकर यांच्याकडून चार्ज काढण्यात आला – सहकार मंत्री अतुल सावे यांची माहिती

### भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर विधान परिषदेत आ. संजय खोडके यांचा सरकारला सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती**

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीतील (एपीएमसी) सचिवांमार्फत करण्यात आलेल्या आर्थिक गैरव्यवहारांवरून मोठा वाद निर्माण झाला असून, यावरून विधान परिषदेत आमदार संजय खोडके यांनी लक्षवेधी सूचना मांडत सरकारला धारेवर धरले. त्यांनी समितीतील भ्रष्टाचार, नियमबाह्य खर्च, बनावट प्राकलने, निविदाविना कामे यावर प्रकाश टाकत संबंधित सचिवावर तात्काळ कारवाईची मागणी केली.या पार्श्वभूमीवर राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधान परिषदेत सांगितले की अमरावती एपीएमसीतील सचिवाचा कार्यभार तत्काळ काढण्यात आला असून, सचिवाविरोधात खुली चौकशी करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. संचालक मंडळालाही कारणे दाखवा नोटीस बजावली असून, न्यायालयाचा निकाल आल्यानंतर एक महिन्याच्या आत मंडळ बरखास्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.भ्रष्टाचाराची साखळी उघडआ. संजय खोडके यांनी सभागृहात स्पष्ट केले की, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी ४४ लाख रुपयांची कामे व ३ विद्युत प्रकल्पांना मान्यता दिली होती. मात्र ही कामे शासनाच्या खरेदी प्रक्रिया नियमांचे उल्लंघन करून,




निविदाविना व बनावट प्राकलने तयार करून करण्यात आली.विशेष म्हणजे विद्युत कामासाठी ई–निविदा न राबवता, एका कामाचे अनेक खोटे अंदाजपत्रके तयार करण्यात आली. याशिवाय सफाई ठेकेतही गंभीर भ्रष्टाचार झाला असून, समितीने अपूर्ण व दिशाभूल करणारा खुलासा दिला, असा आरोपही आ. खोडके यांनी केला.चौकशी अहवालात गंभीर निरीक्षणया प्रकरणात जिल्हा उपनिबंधक व लेखा परीक्षक समितीने सखोल चौकशी करून अहवाल सादर केला होता. त्यात सचिवासोबत संपूर्ण संचालक मंडळही दोषी ठरले आहे. या अहवालावरून अपहारीत रक्कमेची वसूली आणि फौजदारी कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली होती.पणन संचालक कार्यालयाने समितीच्या अपिलास नकार देत चौकशी अहवालाला वैध मान्यता दिली असून, कारवाईसाठी जिल्हा उपनिबंधकांना मोकळीक दिली आहे.संचालक मंडळाचे भवितव्य ठरणार न्यायालयाच्या निकालावरसदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून एका संचालकाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्यायालयाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर एपीएमसी कार्यकारिणी मंडळ बरखास्त करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू केली जाईल, असे मंत्री रावल यांनी स्पष्ट केले.